# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- १६/०९/२०१९

## मा. विशेष स्थायी समिती सभा

## सभा सूचना क्र. ०९

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती ..............................................
स्थायी समिती सदस्य/सदस्या,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष स्थायी समिती सभा मंगळवार दि. १७/०९/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लालबहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०९ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

मा. सभापती, स्थायी समिती यांच्या मान्यतेने

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. विशेष स्थायी समिती सभा दि. १७/०९/२०१९ सभा सुचना क्र. ०९ विषय पत्रिका

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| १०२ | आरोग्य विभागात ठोक मानधनावर कार्यरत असलेले पशुवैद्यकीय अधिकारी यांना ०६ महिन्यांसाठी नियुक्तीस नवीकरण करणेबाबत. |
| १०३ | महानगरपालिका आस्थापनेवरील ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत असणाऱ्या लघुटंकलेखक यांच्या नेमणुकीचे नवीकरण करणेबाबत. |
| १०४ | रस्ते फेरीवाला मुक्त ठेवणेकामी दिलेल्या कार्यादेशाची मुदतवाढ देणे व झालेल्या खर्चास मंजुरी मिळणेबाबत. |
| १०५ | निविदेस मान्यता देणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग) |
| १०६ | निविदेस मान्यता देणेबाबत. (पे ॲन्ड पार्क विभाग) |
| १०७ | हाऊसकिपींग करीता मागविण्यात आलेल्या निविदेचे दर मंजूर करणेबाबत. |
| १०८ | मा. आयुक्त सो. यांनी मंजूर केलेल्या कामांचे अवलोकन करणे. (आपत्ती व्यवस्थापन विभाग) |

दिनांक :- १६/०९/२०१९

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती दि. १७/ ०९/2019

### // गोषवारा //

प्रकरण क्र. १०२ आरोग्य विभागात ठोक मानधनावर कार्यरत असलेले पशुवैद्यकीय अधिकारी यांना 06 महिन्यांसाठी नियुक्तीस नवीकरण करणेबाबत...

मिरा भाईंदर महानगरपालिका आरोग्य विभागातील मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील तात्पुरत्या स्वरुपातील ठोक मानधनावर कार्यरत असलेले पशुवैद्यकीय अधिकारी यांना 06 महिन्यांसाठी नियुक्तीस नवीकरण करणे आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | पदनाम | मुदत संपुष्टात येण्याची दिनांक |
|---|---|---|---|
| 1. | डॉ. विक्रम निराटले | पशुवैद्यकीय अधिकारी | दि.05/09/2019 |

सदर पशुवैद्यकीय अधिकारी यांची तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर नियुक्ती केली होती. आरोग्य विभागाने दि.30/07/2019 रोजी पत्र देऊन नियुक्तीचे नविकरणेस नमुद केले आहे. परंतू सदर आरोग्य विभागात पशु वैद्यकीय अधिकारी हे पद मंजूर नसून पशु वैद्यकीय विभागात पशुशल्य चिकित्सक हे पद आकृतीबंधात मंजूर आहे.. पशुवैद्यकीय अधिकारी यांची मुदत दि.05/09/2019 रोजी संपुष्टात येत असल्याने दि.06/09/2019 रोजी 01 दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.07/09/2019 ते दि.06/03/2020 पर्यंत पुढील 06 महिन्यासाठी नियुक्तीचे नवीकरण करणे आहे.

सदर पशुवैद्यकीय अधिकारी यांची मुदत दि.05/09/2019 रोजी संपूष्टात येत आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 53 (3) नुसार 06 महिन्यांकरीता नियुक्तीचे नवीकरण करणेबाबत मा. स्थायी समितीस अधिकार असल्याने मा. स्थायी समितीची मंजूरी घेऊन वरील पशुवैद्यकीय अधिकारी यांना 01 दिवसाचा तांत्रिक खंड देऊन 06 महिन्यांसाठी नियुक्तीचे नवीकरण करणेस शिफारस आहे.

(मा. आयुक्त सो. यांचे मान्यतेने)

(डॉ. सुनिल लहाने)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. १७/०९ /2019

// गोषवारा //

प्रकरण क्र. :-१०३ महानगरपालिका आस्थापनेवरील ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात कार्यरत असणाऱ्या लघुटंकलेखक यांच्या नेमणुकीचे नवीकरण करणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात मा. स्थायी समिती ठराव क्र.10 अन्वये 04 लघुटंकलेखक यांची किमार वेतन दरानुसार सहा महिन्याकरीता नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यापैकी 02 लघुटंकलेखकाने राजीनामा दिलेला आहे. उर्वरित 02 लघुटंकलेखक कार्यरत आहेत.

मा. महासभा ठराव क्र.138 अन्वये व दि.03/03/2016 रोजीच्या मा. महापौर यांचया अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत आयुक्त यांना सर्व विभागाचे किमान वेतनाबाबतचे दावे निकाली काढण्यासाठी प्राधिकृत केल्यानुसार किमान वेतन दारानुसार लघुटंकलेखक यांना वेतन अदा करण्यात येत आहे.

| अ.क्र. | लघुटंकलेखकची नावे | पदनाम | सध्या कार्यरत विभाग |
|---|---|---|---|
| 1. | श्री. अनिल तुकाराम बहिरम | लघुटंकलेखक | नगरसचिव विभाग |
| 2. | श्री. गुणवंत दयाराम सपकाळे | लघुटंकलेखक | नगरसचिव विभाग |

मा.स्थायी समिती सभा दि.01/03/2019 प्रकरण क्र.215 ठराव क्र.180 अन्वये सदर लघुटंकलेखकांच्या नियुक्तीस दि.25/09/2019 पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. त्या अन्वये सदर लघुटंकलेखकांची मुदत दि.25/09/2019 रोजी संपुष्टात येणार आहे.

महानगरपालिका मा. महासभा, मा.स्थायी समिती सभा, आयुक्त, अतिरिक्त आयुक्त व उपायुकत (मुख्यालय) यांचे बैठकांचे इतिवृतांत, प्रभाग समिती सभा, वृक्ष प्राधिकरण समिती सभा, महिला बालकल्याण समिती सभा इत्यादी सभांचे इतिवृतांत लिहिण्यासाठी लघुटंकलेखकांची आवशकता आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 53(3) नुसार तात्पुरत्या नेमणुकीसाठी मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी घेणे अनिवार्य आहे.

महानगरपालिकेचया कामाची निकड व आवश्यकता पाहता सदर लघुटंकलेखकांची दि.27/09/2019 ते दि.26/03/2020 पर्यंत 06 महिन्याकरीता नव्याने नेमणुक करणेस मा.स्थायी समितीस शिफारस आहे.

(मा. आयुक्त यांचे मान्यतेने)

(डॉ. सुनिल लहाने)
अतिरिक्त आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

\\desktop-hs40i3j\D\आस्थापना विभाग\संगणक चालक\गोषवारा- लघुलेखक मुदत वाढ.doc

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे - ४०१ १०१, दुरध्वनी क्र. : २८१९ २८२८.

।। गोषवारा ।।

मा. स्थायी समिती दि. १७ /०९/२०१९

**प्रकरण क्र. १०४ :- रस्ते फेरीवाला मुक्त ठेवणेकामी दिलेल्या कार्यादेशाची मुदतवाढ देणे व झालेल्या खर्चास मंजुरी मिळणेबाबत**

मा.महासभा दि.१९/०७/२००८ ठराव क्र.२९ अन्वये फेरीवाला व ना-फेरीवाला क्षेत्राबाबतचे धोरण निश्चीत केलेले असून ना-फेरीवाला क्षेत्रातील फेरीवाल्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम २३१ अन्वये काढून टाकणेकरीता मिरा भाईंदर महानगरपालिका मा.स्थायी समिती सभा दि.२९/१२/२०१८ रोजी प्रस्तावाच्या अनुषंगाने चर्चा झाली आहे. सदर चर्चेमधील **मुद्दा क्र. ३** अन्वये अतिक्रमण विभागाअंतर्गत फेरीवाला हटविण्यासाठी मनपाची यंत्र सामुग्री अपुरी पडत असल्याने कंत्राटदार नियुक्त करणे बाबत प्रस्ताव सादर करणेस सुचित केलेले होते. त्याप्रामणे मा. स्थायी समिती सभा दि.१५/०२/२०१९ अन्वये प्रकरण क्र.२०६ ठराव क्र.१७१ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील महत्त्वाचे १३ रस्ते रहदारीस व वाहतूकीसाठी मोकळे ठेवणेसाठी व महानगरपालिका ताब्यात असलेले आरक्षणाचे संरक्षण करणेकामी स्वतंत्र पथकाची नेमणूक करणेबाबत व सदरचे काम मे. एस.डी. सर्व्हीसेस यांना देणेस मंजुरी दिली होती. त्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची "ड" चे प्रकरण पाच (दोन) (दोन) अन्वये मंजुरी दिली होती त्यानुसार मे. एस.डी. सर्व्हीसेस यांना **जा.क्र.मनपा./सा.बां./१२६६४/२०१८-१९ दि.०६/०३/२०१९ अन्वये** दि.०७/०३/२०१९ ते दि.०६/०६/२०१९ पर्यंत तीन महिने कालावधी करीता प्रायोगिक तत्वावर कार्यादेश देण्यात आलेले आहे. सदर पथकाची मुदत दि.०६/०६/२०१९ रोजी संपुष्टात आली होती. त्यामुळे **जा.क्र. मनपा./अवि/१९२/२०१९-२० दि.२३/०७/२०१९ अन्वये** ठेकेदारास दि.०६/०८/२०१९ पर्यंत दोन महिने करीता मुदतवाढ देण्यात आली आहे. सदर कामी ई-टेडरींग जाहिर निविदा प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. त्यानुसार चार निविदा प्राप्त झालेल्या आहेत. सदरच्या निविदेचा तांत्रिक लिफाफा उघडुन कागदपत्राची छाननी केली असता चारही निविदा अपात्र ठरत आहेत. त्यामुळे निविदेतील Envelope-1 अटीशर्ती मध्ये दुरुस्ती करुन सदर कामाची फेर निविदा ई-टेंडरींगद्वारे मागविणे बाबत कार्यवाही प्रस्तावित आहे.

सन २०१९-२० या आर्थिक वर्षा मध्ये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये **"मुख्य रस्त्यांवरील अनधिकृत फेरीवाले हटविणे कामी येणारा खर्च"** या लेखाशिर्षा खाली रक्कम रु. २.०० कोटी तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामधील ठेकेदार मे. एस.डी. सर्व्हीसेस यांचे माहे -मार्च व एप्रिल २०१९ मधील बील रक्कम रु. ३४,८९,६३६/- अदा करण्यात आले आहे. माहे मे २०१९ ते जुलै २०१९ या तीन महिन्याचे बील रक्कम रु.४९,९२,२७९/- इतके देयक अदा करणे बाकी आहे.

मा. महासभा दि.०७/०६/२०१९ प्रकरण क्र.१३ ठराव क्र.१५ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात करावयाचे कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदर अंदाज पत्रकातील अनु.क्र. १२ मध्ये मिरा भाईंदर महानरपालिका क्षेत्रात फेरीवाल्यां वर कार्यवाही साठी पथक नेमणे या कामाकरीता रक्कम रु. १.०० कोटी खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात आलेली आहे.

तरी फेर निविदा प्रक्रीया पूर्ण होईपर्यंत व कामाचा कार्यादेश देईपर्यंत दि.०७/०८/२०१९ पासुन मे एस. डी. सर्व्हीसेस यांना मुदतवाढ देणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मा. स्थायी समितीची मंजुरी मिळणेस शिफारस असे.

(मा. आयक्त सो. यांच्या मान्यतेने)

उप- आयुक्त(अतिक्रमण)
मिरा भाईंदर महानगपालिका

गोषवारा प्राप्त दि. ०८/०८/२०१९ वेळ. ११:५०
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवार नोंद
रजिस्टर अ. क्र. ४९ वर्ष :- २०१९/२०
लिपीक ०८/०८/१९
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

C:\Users\a\Desktop\pc\Nivida\Goshwara

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम विभाग

## मा. स्थायी समिती सभा दि. १७ /09/2019

## // गोषवारा //

प्रकरण क्र. ( १०५ ) :- निविदेस मान्यता देणेबाबत.

| अ क्र | टेंडर आय डी | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | 467356_1 | भाईदर (प.) रेल्वे समांतर रस्ता मिरारोड स्टेशन पर्यंत तयार करणे. (१५ मीटर रुंदी व एका बाजूस गटारासह)<br><br>**मे. गजानन कंस्ट्रक्शन**<br><br>मे. एम.एस. इंटरप्रायझेस | रु.९,८८,६२,४०७/-<br>(जी.एस.टी. रक्कम वगळून)<br><br>१४.९९००% जास्त दराने<br>**दरवाटाघाटी नंतर**<br>**८.३० % जास्त दराने**<br>**(सन २०१९-२० च्या राज्यदरसुचीतील दराशी तुलना करता अंदाजपत्रकीय दराची)**<br>१९.००००% जास्त दराने |
| २. | 467356_1 | भाईदर (प.) मोर्वा भाटी येथील मैदानात स्टेजचे बांधकाम व मैदानाचे सपाटीकरण करणे.<br><br>**मे. मधुराणी इंटरप्रायझेस**<br><br>मे. ॲरॉन इंटरप्रायझेस<br>मे. कंचन कंस्ट्रक्शन कं.<br>मे. रिध्दीका इंटरप्रायझेस | रु.८८,८७,४५७/-<br>(जी.एस.टी. रक्कम वगळून)<br><br>९.९००० % जास्त दराने<br>**दरवाटाघाटी नंतर**<br>**४.९७ % जास्त दराने**<br>**(सन २०१९-२० च्या राज्यदरसुचीतील दराशी तुलना करता अंदाजपत्रकीय दराची)**<br>१८.०००० % जास्त दराने<br>१३.५००० % जास्त दराने<br>२०.०००० % जास्त दराने |
| ३. | 470675_1 | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील धोकादायक १८ इमारती तोडणे. | - |

| अ. क्र. | प्रभाग क्र. | इमारतीचे नाव | मजले | ठेकेदाराकडून प्राप्त होणारी रक्कम (सर्व करांसहीत) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **मे. व्ही.के. इंटरप्रायझेस** | मे. सिटीझन इंटरप्रायझेस | मे. रिध्दीका इंटरप्रायझेस |
| १ | ०१ | ओमकार टॉवर सोसायटी प्रा.लि.<br>सिध्दीविनायक मार्ग, बेकरी गल्ली, भाईंदर (प.) | तळ + ०७<br>आर.सी.सी. | २०००००.०० | १५५०००.०० | १५०००.०० |
| २ | ०१ | गजानन निवास<br>राममंदिर रोड, भाईंदर (प.) | तळमजला<br>(कौलारु) | ३००००.०० | १००००.०० | - |
| ३ | ०२ | नव पार्श्व नगर नं. १ को.ऑ.हौ.सो.लि.<br>स्टेशन रोड, भाईंदर (प.) | तळ + ०४<br>अर.सी.सी. | १११०००.०० | ३५०००.०० | ११०००.०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ०२ | जेन्हा विला बंगला<br>१/७७, नरोन्हा कंपाऊंड,<br>क्रॉस गार्डन, बाकोळ स्ट्रीट,<br>भाईंदर (प.) | तळ + ०१<br>अर.सी.सी. | ३००००.०० | १५०००.०० | - |
| ५ | ०३ | चंद्रदर्शन को.ऑ.हौ.सो.लि<br>रेल्वे समांतर रस्ता,<br>बंदरवाडी, भाईंदर (पुर्व) | तळ + ०२<br>आर.सी.सी. | ५००००.०० | २००००.०० | ५०००.०० |
| ६ | ०३ | डिवाईन सॅरेटॉन प्लाझा<br>जैसलपार्क, भाईंदर (पूर्व) | तळ + ०३ व<br>तळ + ०४<br>आर.सी.सी. | १७५०००.०० | ९००००.०० | ११०००.०० |
| ७ | ०३ | श्रीनाथ (इमारत क्र. ०२)<br>को.ऑ.हौ. सो.लि.<br>गोडदेव नाक्याजवळ,<br>गोडदेव, बी.पी. रोड,<br>भाईंदर (पुर्व) | तळ + ०४<br>आर.सी.सी. | १०००००.०० | ३५०००.०० | ५०००.०० |
| ८ | ०३ | श्रीनाथ अे,बी<br>को.ऑ.हौ.सो.लि.<br>गोडदेव नाक्याजवळ,<br>गोडदेव, बी.पी. रोड,<br>भाईंदर (पुर्व) | तळ + ०४<br>आर.सी.सी. | १२५०००.०० | ३५०००.०० | १२०००.०० |
| ९ | ०३ | पाटील ब्रदर्स इस्टेट<br>बी.पी. क्रॉस रोड, भाईंदर<br>(पुर्व) | तळमजला<br>लोडबेरींग | ११०००.०० | १००००.०० | - |
| १० | ०३ | राठी उद्योग नगर, गाळा<br>नं.२०/२१<br>नवघर रोड, बंदरवाडी,<br>भाईंदर (पुर्व) | तळ + ०१<br>आर.सी.सी. | २५०००.०० | २००००.०० | - |
| ११ | ०३ | निर्विकार को.ऑ.हौ.सो.लि.<br>अभिनव विद्या मंदिरसमोर,<br>गोडदेव, भाईंदर (पुर्व) | तळ + ०३<br>आर.सी.सी. | ६००००.०० | ४५०००.०० | ५०००.०० |
| १२ | ०४ | क्रिस्टल अे,बी,सी,डी,एफ<br>को.ऑ.हौ.सो.लि.<br>साई पेट्रोलपंप समोर,<br>मिरा-भाईंदर रोड,<br>मिरारोड (पुर्व) | अे - तळ + ०३<br>बी - तळ + ०३<br>सी - तळ + ०३<br>डी - तळ + ०३<br>इ - तळ + ०३<br>एफ - तळ + ०३<br>मजली<br>आर.सी.सी. | ३०००००.०० | २५००००.०० | २५०००.०० |
| १३ | ०४ | प्राजक्ता ए. बी विंग को. ऑ.<br>हौ.सो. लि.<br>श्रीनाथ कॉम्पलेक्स,<br>मिरारोड (पुर्व) | A B तळ + ०३<br>मजली<br>आर.सी.सी. | १०००००.०० | ३५०००.०० | ५०००.०० |
| १४ | ०४ | न्यु कल्पिता अपार्ट.<br>को.ऑ.हौ.सो.लि.<br>नवघर रोड, भाईंदर (पुर्व) | तळ + ०२<br>आर.सी.सी. | ५००००.०० | २००००.०० | - |
| १५ | ०५ | चंद्रेश टेरेस<br>को.ऑ.हौ.सो.लि.<br>(अे,बी,सी,डी विंग)<br>मिरा-भाईंदर रोड, पेट्रोल<br>पंप जवळ, पार्श्वनगर<br>मिरारोड (पूर्व) | तळ + ०३<br>आर.सी.सी. | २०००००.०० | २५०००.०० | ११०००.०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १६ | ०६ | शितल प्लाझा ए,बी,सी,डी को.ऑ.हौ.सो.लि. एम.टी.एन.एल. रोड, शितल नगर, मिरारोड (पूर्व) | तळ + ०२ आर.सी.सी. | १००००० .०० | २०००० .०० | - |
| १७ | ०६ | अहमद पटेल चाळ डायमंड ऑवरसमोर, मिरा-भाईंदर रोड, काशिमिरा, मिरारोड (पुर्व) | तळमजला सिमेंट पत्रे | २०००० .०० | ५००० .०० | - |
| १८ | ०६ | साईनाथ चाळ मिरागाव, मिरारोड (पुर्व) | तळ + ०१ आर.सी.सी. | २५००० .०० | ५००० .०० | - |
| | | | **एकूण** | **१७१२००० .००** | ८३०००० .०० | १०५००० .०० |

वरील निविदांना कामांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार जी.एस.टी. रकमेसह मान्यता देण्यास शिफारस आहे.

**कार्यकारी अभियंता (सा.बां)**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

Pc7/DK/19-20/SG-12

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## आपत्ती व्यवस्थापन विभाग
## मा. स्थायी समिती दि. १७/०९/२०१९

// गोषवारा //

**विषय : मा. आयुक्त सो. यांनी केलेल्या कामाचे अवलोकन करणे.**

**प्रकरण क्र. :** १०८

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये गणपती विसर्जन ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात सी.सी.टी.व्ही पुरवठा करणे व यंत्रणा कार्यान्वित करणे कामी आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत ऑनलाईन (Tender ID 2019_MBMC_479184_1) निविदा मागविण्यात आल्या होत्या. याकामी प्राप्त निविदांमध्ये मे. मिरॅकल इलेक्ट्रीकल्स सोल्यूशन्स इंडिया प्रा. लि. यांचे सर्वात कमी असून जिल्हा दर सूचीतील (DSR) दरांशी तुलना केली असता अंदाजपत्रकीय दर असल्याचे आढळून आले. याकामी प्राप्त दर खालीलप्रमाणे :

| अ.क्र. | तपशिल | मंजुर दर | दिवस | संख्या | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | Providing, commissioning & maintaining CCTV system with 8 Channel NVR, IP Video / Audio input – 1 no., IP Based 2.0 MP, Full HD, IR IP Dome Camera – 2 Nos. IP Based 2.0 MP, Full HD, IR IP PTZ Camera – 2 Nos., 2 TB Hard Disk – 2 No., 32" Full HD Professional Display – 1 No., 8 Port PoE Switch – 1 No., Power Supply Unit to Camera -1 no., On Lin UPS – 1 No., with necessary Mains, Switchgears on Hire Basis for One Day | रू. ११,९९७/- | ६ | १० | रू. ७,१९,८२०/- |
| २ | Providing, Commissioning & Maintaining additional IP Based 2.0 MP, Full HD, IR IP Dome Camera in Existing CCTV system with necessary Mains, Switchgears on Hire Basis for One Day | रू. ९९९/- | ६ | २६ | रू. १,५५,८४४/- |
| | एकूण | | | | रू. ८,७५,६६४/- |

उपरोक्त कामाचे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(ड) अन्वये अवलोकनार्थ सादर .

(डॉ. सुनिल लहाने)
अतिरीक्त आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका